महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : १७ वा दिनांक : ०१/१०/२०२४ वार : मंगळवार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मोठे निर्णय



**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुख्यमंत्री एकनथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात पार पडली. त्यामध्ये विविध खात्यांसह एकूण 38 निर्णय घेण्यात आले आहेत. विधानसभा निवडणुकांसाठीच्या आचारसंहितेची घोषणा होण्यापूर्वी हे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये, कोतवालांच्या मानधानात 10 टक्के वाढ करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही घेण्यात आला आहे. ऑक्टोबर महिन्यातील पहिल्याच आठवड्यात विधानसभा निवडणुकांची घोषणा होऊन आदर्श आचारसंहिता लागू केली जाईल. त्यामुळे, राज्य सरकारच्यावतीने जास्तीत जास्त निर्णय घेऊन जनतेला लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. कारण, विधानसभा निवडणुकांनंतर नवीन सरकार स्थापन होईल. तत्पूर्वी बैठकांचा आणि निर्णयांचा धडाका सुरू आहे.

**मंत्रिमंडळ बैठकीतील निर्णय :** कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ. अनुकंपा धोरणाही लागू (महसूल विभाग), ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन तसेच प्रोत्साहन अनुदान (नियोजन विभाग), ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्गाच्या कामाला गती देणार, एमएमआरडीए ला बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्यास मान्यता, (नगर विकास विभाग), ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामास गती देणार. १२ हजार २०० कोटींच्या सुधारित आराखड्यास मान्यता (नगर विकास विभाग), ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गासाठी १५ हजार कोटी कर्जरूपाने उभारणार (नगर विकास विभाग), देशी गाईंच्या पालन पोषणासाठी अनुदान योजना. (पशुसंवर्धन विभाग).

भारतीय खेळ प्राधिकरणाला आकुर्डी, मालाड व वाढवण येथील जागा नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणार (क्रीडा विभाग), रसायन तंत्रज्ञान संस्थेस ठाणे येथील मौजे खिडकाळीची जागा (महसूल विभाग), राज्य जलसंपत्ती माहिती केंद्र स्थापणार. जलस्त्रोतांचे उत्तम नियोजन करणार (जलसंपदा विभाग), जळगाव जिल्ह्यातल्या भागपुर उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता. ३० हजार हेक्टर जमीन सिंचित होणार (जलसंपदा विभाग), लातूर जिल्ह्यातील हासाळा, उंबडगा, पेठ, कव्हा कोल्हापूर बंधाऱ्याच्या कामास मान्यता (जलसंपदा विभाग).

धुळ्याच्या बीएपीएस स्वामीनारायण संस्थेस ग्रामस्थांच्या विकासासाठी जमीन (महसूल विभाग), रमाबाई आंबेडकर नगर, कामराजनगरच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती देणार. एमएमआरडीए ला जमीन अधिमूल्य भरण्यास सवलत (नगर विकास विभाग), केंद्राच्या मिठागराच्या जमिनी राज्य शासनाकडे हस्तांतरित करणार. दुर्बलांसाठी घरांच्या योजनांना वेग येणार (गृहनिर्माण विभाग), पालघर जिल्ह्यातील मुरबे येथे बहुउद्देशीय बंदर प्रकल्प जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर विकासक (बंदरे विभाग)

धारावीतल्या अपात्र झोपडी-धारकांसाठी परवडणारी भाडेतत्त्वावरील घरे योजना, धारावी पुनर्वसन प्रकल्पावर जबाबदारी (गृहनिर्माण विभाग), सेवानिवृत्ती उपदान, मृत्यू उपदानाची मर्यादा वाढवून २० लाख (वित्त विभाग), अनुसूचित जाती, नवबौद्ध शेतकऱ्यांसाठी कृषी स्वावलंबन योजनेचे आर्थिक निकष वाढवले अधिकाधिक शेतकऱ्यांना लाभ होणार, (कृषी विभाग) सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज आर्थिक विकास महामंडळ, (इतर मागास बहुजन कल्याण), जामखेडच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सूत गिरणीला, अर्थसहाय्य करणार (इतर मागास बहुजन कल्याण) राज्यातील होमगार्डांच्या भत्त्यात भरीव वाढ.

सुमारे ४० हजार होमगार्डना लाभ (गृह विभाग), नाशिकचे वैद्यकीय पदवी महाविद्यालय व रुग्णालय शासनाच्या अखत्यारीत घेणार (वैद्यकीय शिक्षण), आयुर्वेद, युनानी महाविद्यालयातील पदभरतीसाठी निवड समिती (वैद्यकीय शिक्षण), राज्यातील आणखी २६ आयटीआय संस्थांचे नामकरण (कौशल्य विकास), आर्य वैश्य समाजासाठी श्री वासवी कन्यका आर्थिक विकास महामंडळ (नियोजन विभाग).

श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर समितीवरील सदस्यांची संख्या वाढवून १५ (विधी व न्याय विभाग), अधिसंख्य कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित (सामान्य प्रशासन विभाग), बार्टीच्या धरतीवर वनार्टी स्वायत्त संस्था (इतर मागास बहुजन कल्याण), मेट्रो तीन प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी मुद्रांक शुल्कात सवलत (महसूल विभाग) जिल्हा परिषदेतील २००५ नंतर रुजू कर्मचाऱ्यांना एक वेळ पर्याय (ग्रामविकास विभाग).

पंचगंगा नदी प्रदूषणासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प अद्यावत करणार (उद्योग विभाग) राज्यात विशेष शिक्षक पदाची निर्मिती. ४८६० पदे (शालेय शिक्षण), शासन हमी शुल्काचा दर कमी करण्याचा निर्णय. हमी शुल्क माफी मिळणार नाही (वित्त विभाग) अवयवदान व अवयव प्रत्यारोपणासाठी यंत्रणा. जनजागृतीवर भर ( वैद्यकीय शिक्षण विभाग), माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीचा दुसरा तिसरा अहवाल स्वीकारला ( सामान्य प्रशासन विभाग) राज्यातील सैनिकी शाळांसाठी आता सुधारित धोरण.

(शालेय शिक्षण) डाळिंब, सीताफळ इस्टेट उभारणार उत्पादकांना मोठा लाभ (कृषी विभाग) महसुली उत्पन्न वाढवण्यासाठी मुद्रांक अधिनियमात सुधारणा (महसूल विभाग)

## धुळे-सोलापूर महामार्गावर एकलव्य संघटनेचा रास्तारोको

**कन्नड:** धनगर समाज हा धनगड ह्या जमातीच्या नावाचा गैर फायदा घेत असून मोर्चे, आंदोलन, उपोषण करून धनगर समाजाला आदिवासी मध्ये समाविष्ट करण्यात यावे, अशी असंविधानिक मागणी ते करत आहेत. आदिवासी (अनु-जमाती) मध्ये कुणाचीही घुसखोरी न करणे व बिगर आदिवासींना आदिवासी अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. तसेच धनगर समाजाला अनुसूचित जमातीमध्ये समाविष्ट करू नये या मागणीसाठी एकलव्य संघटनेचे अध्यक्ष पवन सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाज बांधवांनी कन्नड जवळील धुळे-सोलापूर महामार्गावर रास्तारोको आंदोलन केले.

16 फेब्रुवारी 2024 रोजी मुंबई उच्च न्यायालयाने धनगर व धनगड एकच असलेल्या याचिकेवर सुनावणी केली असता धनगर ही जात असून धनगड ही जमात असल्याचे सांगत धनगर समाजाची याचिका फेटाळून लावली आहे. केवळ मतांच्या राजकारणासाठी मुख्यमंत्री यांनी धनगर समाजाला आदिवासीमध्ये समाविष्ट करण्यात येणार असल्याचे जीआर काढण्याचे सांगत महाराष्ट्रातील आदिवासी समाजाच्या भावनेशी खेळणारा निर्णय घेतला आहे, असा आरोप यावेळी करण्यात आला.

हा निर्णय तात्काळ मागे घेण्यात यावा, अन्यथा एकलव्य संघटना सह महाराष्ट्रातील सर्व आदिवासी संघटना ह्या आपण घेतलेल्या निर्णयाविरोधात रस्त्यावर उतरतील व होणाऱ्या परिणामास आपले शासन जबाबदार राहील. तसेच पंढरपूर येथे सुरू असलेल्या धनगर समाजाच्या उपोषणांमध्ये आदिवासी समाजाबद्दल जातीवाचक बेताल वक्तव्य करणाऱ्या पांडुरंग मैलगर यांच्यावर अनुसुचित जाती जमाती कायदा अंतर्गत अट्रॉसिटी अक्टनुसार गुन्हा दाखल करण्यात यावा, आदी मागणीचे शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी अध्यक्ष पवन सोनवणे, जिल्हाध्यक्ष सुनिल ठाकरे, परशुराम सोनवणे, बापू तळवाडे, राजू ठाकरे, कडूबा पवार, लक्ष्मण माळी,किशोर पवार यांच्या सह आदिवासी समाज मोठ्या संख्येने उपस्थितीत होता.

## शरद पवार हे मिनी औरंगजेब

**पुणे:** भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी पुन्हा एकदा राष्ट्रवागी शरदचंद्र पवार गटाचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्यावर जहरी टीका केली आहे. शरद पवार हे राज्यातील मिनी औरंगजेब आहेत, असं ते म्हणाले.

शरद पवार हे अहमदनगरला गेले असता अहमदनगरचे नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवीनगर न करता ते अहमदनगरच राहावं यासाठी घोषणाबाजी करण्यात आली. घोषणाबाजी करणाऱ्यांना शरद पवारांमध्ये औरंगजेबाचे काही गुण दिसले असतील म्हणून त्यांच्यासमोर घोषणाबाजी करण्यात आली, असंही गोपीचंद पडळकर म्हणाले.

गोपीचंद पडळकर काय म्हणाले?

शरद पवार हे पुण्यश्लोक अहिल्यादेवीनगरला गेले आहेत. ते गाडीतून उतरत असताना तिथे काही खऱ्या औरंग्याच्या पिलावडी घोषणा देत आहेत की आम्हाला अहमदनगरच नाव पाहिजे, अहिल्यानगर नको. मग माझ्यासारख्या कार्यकर्त्याला प्रश्न पडला की वर्षभरापासून नामांतराचा विषय सुरु आहे. मे २०२३ ला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी घोषणा केली. अहमदनगरचं नाव बदलून पुण्यश्लोक अहिल्यादेवीनगर करु आणि त्यांनी केलं, मंत्रिमंडळात निर्णय झाला, केंद्रात पाठवला. केंद्र रेल्वे आयोगाची मंजुरीही आली. पोस्टाचीही येईल.

धरगरांचं वाट्टोळ करायचं असेल, तर महाराष्ट्रातील शेंबड्या पोरांनाह माहितीये, याला परफेक्ट सोल्यूशन काय तर शरद पवार. हे सगळ्या लोकांना माहिती आहे. म्हणून त्यांनी तिथे घोषणा दिल्या. महाराष्ट्रातील सर्व अहिल्याभक्तांना माझी विनंती आहे, हे काय चाललंय बघा. यांना महाराष्ट्रात दंगली पेटवायच्या आहेत. सगळा हिंदू समाज हा अहमदनगरमध्ये रस्त्यावर उतरलेला दिसेल, असा इशाराही पडळकरांनी यावेळी दिला.

पवारांना हा जो गेम सुरुये, की एका बाजुला मतांचा वापर करायचा, राज्यात धनगरांच्या मतांवर सत्तेत यायचं आणि परत धनगरांना मोडून काढायचं. हे यांचं पूर्वीपासूनच धोरण आहे.

मी एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीसांकडे विनंती करतो की या घोषणांमागे काय कारण आहे, याची नीट चौकशी झाली पाहिजे. शरद पवारांचीही चौकशी झाली पाहिजे, पवाराचा खूप लाड करु नका. हे काही वेगळे कोणी माणूस नाही, काय व्हायचं ते होऊ दे, होऊन होऊन काय होणार. महाराष्ट्रात पुन्हा महायुतीची सत्ता येणार आहे, हे राज्यातील सर्व गोरगरीब लोकांनी ठरवलं आहे. त्यांना कळतं महाराष्ट्रात काय चाललंय, असंही ते म्हणाले.

## अदानी हे मोदींचे देव - राहुल गांधी



**नारायणगड :** हरियाणा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधींनी 'हरियाणा विजय संकल्प यात्रा' सुरू केली आहे. पहिल्या दिवशी सोमवार, ३० सप्टेंबर रोजी ही यात्रा नारायणगड ते ठाणेसर आली. येथील जाहीर सभेत राहुल गांधी म्हणाले- मोदीजींचा देव अदानी आहे. ते आदेश देतात, मोदीजी ईडी आणि सीबीआयला पाठवतात आणि काम करून घेतात.

ते म्हणाले - आम्हाला असा भारत नको आहे जिथे २५ लाख लोक चैनीचा आनंद घेतात, हजारो कोटींचे लग्न साजरे करतात आणि शेतकरी आणि मजूर उपाशी मरतात. मोदीजी द्वेष पसरवत आहेत. हिंदू आणि मुस्लिमांमध्ये फूट पाडण्याबद्दल बोलतात. चक्रव्यूहाचा आकार कमळासारखा आहे (भाजपचे निवडणूक चिन्ह), ज्यामध्ये अभिमन्यूला अडकवून मारण्यात आले.

राहुल म्हणाले - अदानींची शस्त्रे लष्कराला विकण्यासाठी अग्निवीर योजना आणली होती. ही योजना म्हणजे सैनिकांचे पेन्शन चोरण्याचा प्रकार आहे.

या दौऱ्यात राहुल यांच्यासोबत बहीण प्रियंका गांधीही होत्या. त्या म्हणाल्या की, पैलवान रस्त्यावर बसून राहिले, पंतप्रधानांकडे त्यांना भेटण्यासाठी ५ मिनिटे वेळ नाही. मोदी सरकार हे फक्त अदानी-अंबानींचे सरकार आहे. त्यांनी शेतकऱ्यांना दहशतवादी म्हटले.

हरियाणात अदानी सरकारची गरज नाही

हरियाणात अदानी सरकारची गरज नाही. शेतकरी आणि मजुरांचे सरकार स्थापन होईल. जेव्हा जेव्हा माझी गरज असेल. तुम्हाला फक्त ऑर्डर द्यावी लागेल, राहुल इकडे या म्हणा. राहुल हजर होणार.

छोटे पक्ष भाजपचे

राहुल म्हणाले- हरियाणात सरकार बनले तर ३६ समुदायांचे सरकार बनवले जाईल. सर्वांचे सरकार स्थापन होईल. सर्वांचा समान सहभाग असेल. हे छोटे पक्ष भाजपचे पक्ष आहेत. ही लढत भाजप आणि काँग्रेसमध्ये आहे. लढा फक्त विचारसरणीचा आहे.

हरियाणात सरकार आल्यावर बदल होईल

हरियाणात सरकार येईल, इथे बदल होईल. मग दिल्लीत सरकार आल्यावर गरीबांच्या खिशात पैसे पाठवणार. मला जिथे संधी मिळेल तिथे ती पूर्ण करेन.

भारतातील मोठ्या कॉर्पोरेट्समध्ये किती दलित आणि मागासलेले लोक आहेत?

राहुल गांधी म्हणाले- मी तुम्हाला एक छोटेसे उदाहरण देतो. तुम्ही शेती करा, छोटासा व्यवसाय करा. तुम्ही दाबलेले आहात. आता मी तुम्हाला एक प्रश्न विचारतो, भारतातील २५० मोठ्या कॉर्पोरेट्स आहेत, त्यात दलित आणि मागासलेले लोक किती आहेत? हेच कॉर्पोरेट लोक कायदे बनवतात, त्यांच्यामध्ये एकही मागासलेला दलित नाही. मग तुमचे कोण ऐकणार?

मला शोधायचे आहे, कोणत्या जातीचे किती लोक आहेत

राहुल गांधी म्हणाले- शेवटची गोष्ट जी सर्वात महत्त्वाची आहे. जात जनगणना. किती लोक कोणत्या जातीचे आहेत हे मला शोधायचे आहे. भारत सरकार ९० अधिकारी चालवतात. यातील तीन अधिकारी ओबीसी प्रवर्गातील असल्याने त्यांना मोठी मंत्रिपदे मिळत नाहीत. मोठ्या मंत्रालयांमध्ये हेच लोक फक्त आठ टक्के आहेत. दलित १५ टक्के आहेत, शंभर रुपयांपैकी एक रुपयाचा निर्णय दलित अधिकारी घेतात. त्यामुळे किती दलित, किती आदिवासी आणि किती मागासवर्गीय हे जाणून घ्यायचे आहे, असे काँग्रेसने म्हटले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०१ ऑक्टोबर २०२४


# मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

## ८ ऑक्टोबर रोजी ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात होणार सन्मान



**मंबई :** यंदाचा दादासाहेब फाळके पुरस्कार मिथुन चक्रवर्ती यांना देण्यात येणार आहे. नुकतेच केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी त्याची अधिकृत घोषणा केली आहे.

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या अधिकाऱ्याने ही घोषणा

निवडकेली आहे. म्हणाले- आम्हाला हे जाहीर करताना अभिमान ज्युरीने भारतीय वाटतो की दादासाहेब फाळके

चित्रपटसृष्टीतील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल या वर्षी दिग्गज अभिनेते श्री मिथुन चक्रवर्ती यांना हा पुरस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे.

८ ऑक्टोबर २०२४ रोजी होणाऱ्या ७० व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात मिथुन चक्रवर्ती यांना हा सन्मान देण्यात येणार आहे.

३५० हून अधिक चित्रपट केले, ३ राष्ट्रीय पुरस्कार जिंकले

१६ जून १९५० रोजी कोलकाता येथे जन्मलेल्या मिथुनदा यांनी बंगाली, हिंदी, तमिळ, तेलगू, कन्नड, ओडिया आणि भोजपुरी अशा विविध भाषांमध्ये ३५० हून अधिक चित्रपट केले आहेत. तीन वेळा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार आणि दोनदा फिल्मफेअर पुरस्कार मिळाला आहे.

मिथुन चक्रवर्ती यांना त्यांचा पहिला राष्ट्रीय पुरस्कार 'मृगया' चित्रपटासाठी मिळाला. बुद्धदेव दासगुप्ता यांच्या 'तहादर कथा' या बंगाली चित्रपटासाठी दुसरा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. या चित्रपटात मिथुन यांनी स्वातंत्र्यसैनिकाची भूमिका साकारली होती.

तिसरा राष्ट्रीय पुरस्कार 'स्वामी विवेकानंद' चित्रपटासाठी मिळाला. या चित्रपटात मिथुन यांनी रामकृष्ण परमहंस यांची भूमिका साकारली होती. काही कारणांमुळे हा चित्रपट चित्रपटगृहात प्रदर्शित होऊ शकला नाही. जानेवारी 2024 मध्ये मिथुन चक्रवर्ती यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

मिथुन चक्रवर्ती यांचे १९८९ साली १९ चित्रपट प्रदर्शित झाले होते, ज्यामध्ये ते मुख्य अभिनेता म्हणून दिसले होते. त्यांच्या या विक्रमाची लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. या घटनेला जवळपास ३५ वर्षे झाली आहेत, परंतु आजपर्यंत एकही अभिनेता हा विक्रम मोडू शकलेला नाही. १९८२ मध्ये आलेला डिस्को डान्सर हा १०० कोटींची कमाई करणारा हिंदी चित्रपटातील पहिला चित्रपट आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसचा पहिला उमेदवार ठरला

**मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोमवारी सातारा जिल्ह्यातील फलटण विधानसभा मतदारसंघाची उमेदवारी दीपक चव्हाण यांना देण्याची घोषणा केली. त्यांच्या या घोषणेमुळे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचा विधानसभा निवडणुकीतील राज्यातील पहिला उमेदवार ठरल्याचे स्पष्ट झाले आहे. फलटण हा अनुसूचित जातीसाठी (एससी) राखीव मतदारसंघ असून, चव्हाण हे तेथून ३ वेळा निवडून आलेत. आता राष्ट्रवादीने त्यांना पुन्हा मैदानात उतरवले आहे.

फलटण विधानसभा मतदारसंघातील उत्तर कोरेगाव तालुक्यातील सोळशी ग्रामपंचायतीचे सोमवारी उद्घाटन झाले. या सोहळ्याला उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित राहणार होते. पण काही कारणास्तव त्यांना या कार्यक्रमाला येता आले नाही. परिणामी, त्यांनी फोनवरूनच या कार्यक्रमाला मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी फलटण विधानसभेची उमेदवारी दीपक चव्हाण यांना देण्याची घोषणा केली.

# सरकार तिन्ही गॅझेट लागू करणार का? मनोज जरांगे

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य मंत्रिमंडळाने आपल्या आजच्या बैठकीत मराठा आरक्षणाशी संबंधित न्यायमूर्ती संदीप शिंदे यांचा दुसरा व तिसरा अहवाल मंजूर केला. त्यावर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी यासंबंधी सरकारला सगेसोयरे अधिसूचनेची अंमलबजावणी व तिन्ही गॅझेट लागू करणार का? असा सवाल करत शिंदे समितीचा अहवाल नकारात्मक असेल तर राज्य सरकारच्या विरोधात भूमिका मांडण्याचा इशारा दिला आहे.

मनोज जरांगे छत्रपती संभाजीनगर येथील एका रुग्णालयात बोलताना म्हणाले, निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीने सादर केलेला अहवाल सरकारने उघड केला नाही. त्यामुळे या अहवालात काय आहे? हे मी सांगू शकत नाही. ही समिती केवळ नोंदी तपासण्यासाठी आहे. मराठा समाज कुणबी कसा आहे, मराठ-कुणबी एकच आहेत. हैदराबाद गॅझेटमध्ये राज्यातील मराठा समाजाविषयीचे अनेक पुरावे आहेत. त्यामुळे राज्यातील जनगणना, १८८४ च्या पूर्वीचे गॅझेट या सर्वांचा विषय अहवालात असण्याची शक्यता आहे. ८३ व्या क्रमांकावर मराठा व कुणबी एकच आहे असा उल्लेख आहे. त्यामुळे शिंदे समितीने त्यावर काम केले

असेल तरच या समितीचा उपयोग आहे,

अन्यथा नाही, असे जरांगे म्हणाले.

मनोज जरांगे म्हणाले, शिंदे समितीने आपल्या अहवालात काय सूचना केल्या हे मला माहिती नाही. ते उघड झाले तेव्हाच त्याला महत्त्व आहे. पण हे सरकार सगेसोयऱ्यांची अंमलबजावणी करणार का? तिन्ही गॅझेट लागू करणार का? हा खरा प्रश्न आहे. सरकारने जनतेचा अपमान केला की त्यंचे वाटोळे झालेच म्हणून समजा. गॅझेटमध्ये असणाऱ्या नोंदी, नंतर सापडलेले ८ हजार पुरावे, संस्थानांकडे असणारे पुरावे, ८० क्रमांक हा भाग वेगळा आहे. शिंदे समिती सगेसोयरेंची अंमलबजावणी व रोटीबेटी व्यवहार हे सर्व सांगण्यासाठी गठीत करण्यात आली होती.

मनोज जरांगे म्हणाले, मराठा व कुणबी हे एकच आहेत हे स्पष्ट करण्यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली होती. राज्यातील मराठा व कुणबी एकच आहे आणि तोच अहवाल राज्य सरकारने स्वीकारला पाहिजे. पुरावे, नोंदी, देवस्थानांकडील पुरावे, ८३ क्रमांकावरील मराठा-कुणबी एकच असल्याचा विषय, सगेसोयरेची अंमलबजावणी आदी सर्वांचा उल्लेख या अहवालात असला पाहिजे. अन्यथा ही सर्वकाही बनवाबनवी असल्याचे सिद्ध होईल. तसेच या समितीने केवळ भंपकपणा, दिखाऊपणा व समाजाला फसवण्याचे काम केले असा आरोप होईल.

# सरकारची मनमानी खपवून घेणार नाही - सचिन सावंत

**मुंबई :** मुंबई सारख्या राज्याच्या राजधानीत व देशाच्या राजधानीत खुलेआम बिल्डरच्या मर्जीने एसआरए जनतेवर अत्याचार करत आहे. हे अत्यंत गंभीर असून याविरोधात खासदार वर्षा गायकवाड आणि आम्ही लढा देणार असून ही मनमानी खपवून घेणार नाही. असा सज्जड इशारा काँग्रेस प्रवक्ते सचिन सावंत यांनी दिला आहे. त्याचबरोबर आज या तोडण कारवाईला स्थगिती मिळाल्याने आमच्या लढ्याला यश मिळाले असून सरकार जनरेट्यासमोर नमले असून या लढ्यात खासदार वर्षा गायकवाड यांचं मोठं योगदान असल्याचे सावंत यांनी स्पष्ट केले.

सावंत म्हणाले की, वांद्रे पूर्व विधानसभा क्षेत्रातील भारत नगर येथील बसेरा सोसायटीवर दोन दिवसांची बेकायदेशीर नोटीस देऊन आज जी तोडण कारवाई एसआरए करणार आहे. त्यातून सरकारची अन्यायाची भूमिका स्पष्ट होत आहे. पुन्हा अदानीच्या प्रकल्पासाठी संपूर्ण प्रशासन दावणीला बांधले आहे. एसआरए भ्रष्टाचाराचा अड्डा झाला आहे. या सोसायटीचा अर्जावर १२ जानेवारी २०२४ रोजी शिखर तक्रार निवारण समितीच्या प्रमुख गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर यांनी सुनावणी घेतली. त्यानंतर थेट ३० ऑगस्ट २०२४ ला आठ महिन्यांनी निकाल दिला.

सावंत म्हणाले की, ऑर्डर २० कोड ऑफ सिव्हिल प्रोसिजरमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की शेवटची सुनावणी झाल्यानंतर एक महिन्याच्या आत किंवा जास्तीत जास्त दोन महिन्यांत निकाल देणे आवश्यक आहे. त्यातही तारीख अपिलार्थीना कळवणे



बंधनकारक आहे. निकालाचे खुलेआम वाचन झाले पाहिजे. परंतु इथे नेटवर टाकून मोकळे झाले. त्यातही अपिलार्थींना नेटवर ऑर्डर दिसत नव्हती का? तेही कारण गूढच आहे. असो! या ऑर्डरच्या आधारे शुक्रवारी मध्यरात्री काहींना नोटीस देण्यात आली आणि दोन दिवसांत तोडणार सांगितले गेले. अदानींची माणसे आज दिवसभर फिरत होती. प्रश्न हा उद्भवतो की वल्सा नायर यांची अदानींच्या धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी नियुक्ती झाली होती मग त्यांनी दुसऱ्या व्यक्तीला सुनावणी घ्यावयास का सांगितले नाही?

सर्वोच्च न्यायालयाने निकालाला जास्त काळ लागला तर पुन्हा सुनावणी घेतली पाहिजे हा निर्णय दिला आहे.तसेच शासनाने ३० सप्टेंबर पर्यंत शासकीय वा खासगी जमिनीवर तोडण कारवाई करु नये असे आदेश एसआरए ला दिले आहेत तरी खुलेआम दुर्लक्ष केले जात आहे. असो! काल ( वल्सा नायर जी सोडून)सर्व SRA अधिकाऱ्यांनी फोन बंद ठेवले होते. हा अन्याय थांबवण्यासाठी खासदार वर्षा गायकवाड आणि आम्ही प्रयत्नशील होतो. या प्रयत्नाचा एक भाग म्हणून अधिकाऱ्यांना कारवाईवर स्थगिती देण्यास विनंती आम्ही केली. जेणेकरून रहिवाशांना न्यायालयात दाद मागण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल. खरं तर जनरेटा आणि आमच्या या लढ्याला यश आल्याचं समाधान आम्हाला आहे. कारण आमच्या लढयापुढं सरकार नेमलं असून आता तूर्तास स्थगिती मिळाली आहे.

मुस्लिम समाजाला टार्गेट करण्यावरून किरीट सोमय्यांना सुनावले खडे बोल

सावंत म्हणाले कि, एखाद्या समाजाला टार्गेट करणे याला विकृत आनंद म्हणतात. ही मानसिकता विकृतीच आहे दुसरे काही नाही. अदानीचा डीपीआर झालेला असताना केवळ निवडणुका पाहून मुस्लिम समाजाला टार्गेट करण्याचा भाजपाचा प्रयत्न आहे.

अदानी चे एजंट असलेले तुमचे सरकार धारावीचा पुनर्विकास करताना सर्वच तोडणार आहे ना? आणि धारावीकरांना डंपिंग ग्राऊंडवर पाठवणार आहात. तर ही घाई कशासाठी? हे जनता ओळखते. रामगिरी महाराज, नितेश राणे, सोमय्या अशा अनेक भाजपा नेत्यांना द्वेष पसरविण्याची जबाबदारी दिली आहे. परंतु हा प्रयत्न फळास येणार नाही. महायुती सरकारचे शेवटचे काही दिवस उरले आहेत. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर प्रचंड बहुमताने येणार ही काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे.

# ठाकरे गटाने इस्लामाबादेत दसरा मेळावा घ्यावा - शिवसेना प्रवक्त्या शीतल म्हात्रे



**छत्रपती संभाजीनगर :** लोकसभा निवडणुकीत उबाठाच्या प्रचार रॅलीत पाकिस्तानचे झेंडे फडकले. त्यात मुंबई बॉम्बस्फोटातील आरोपींचाही सहभाग होता. त्यामुळे उबाठा गटाने पाकिस्तानातील इस्लमाबादमध्ये यंदाचा दसरा मेळावा घ्यावा, अशी घणाघाती टीका शिवसेना प्रवक्त्या शीतल म्हात्रे यांनी सोमवारी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधताना केली. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

शिवसेना महाविजय संवाद यात्रेत महिला आघाडीने छत्रपती संभाजी नगरातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतील लाभार्थीशी सवांद साधला. महिला आघाडीकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण संवाद यात्रा राबवली जात आहे. गेल्या चार दिवसांपासून महिला आघाडीच्या १९ प्रमुख पदाधिकाऱ्यांनी राज्यातील वेगवेगळ्या भागात जाऊन लाडक्या बहिणींशी संवाद साधला. नवरात्रीपूर्वी महिला आघाडीकडून या अभियानाया पाच दिवसांचा पहिला टप्पा पूर्ण होईल, अशी माहिती म्हात्रे यांनी यावेळी दिली.

दसरा मेळाव्यावरुन शीतल म्हात्रे यांनी उबाठाचे प्रवक्ते संजय राऊत यांच्यावर खरमरीत टीका केली. लोकसभा निवडणुकीत तुमच्या प्रचारात पाकिस्तानचे झेंडे आणि बॉम्बस्फोटातील आरोपी सहभागी झाले होते. पवित्र शिवतीर्थावर दसरा मेळावा घेण्याचा विचार करणाऱ्या उबाठा गटाची छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव घेण्याची लायकी नाही. लाडक्या बहिणींना काही देण्याची त्यांची मानसिकता नाही. याऊलट महायुती सरकारकडून लाडकी बहीण योजना, अन्नपूर्णा योजना, मुलींना मोफत उच्चशिक्षण, तरुणांसाठी युवा प्रशिक्षण योजना राबवल्या जात आहेत. लोकसभेत विरोधकांनी जे खोटं नरेटिव्ह पसरवले तो प्रयत्न पुन्हा करु नये यादृष्टीने महाविजय संवाद यात्रेत सरकारच्या कामांची जनजागृती केली जाईल, असे म्हात्रे म्हणाल्या.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेच्या तिसऱ्या टप्प्यात ६३ लाख ७३ हजार महिलांना लाभ मिळाला आहे. यासाठी शासनाकडून ५२१ कोटींचा निधी वितरित करण्यात आला. यातून विरोधकांना एक चपराक मिळाली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे जे बोलतात ते करुन दाखवतात हे पुन्हा एकदा सिद्ध झाले, असेही शीतल म्हात्रे यावेळी बोलताना म्हणाल्या.




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०१ ऑक्टोबर २०२४


## नोकरीची जाहिरात


**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

**मो. ९४२१२ ४५३०९**




पेपरात नोकरीची जाहिरात आली
तिला पाहण्यासाठी गर्दी झाली
नडूनी अर्ज ऑफिसात धाडलेत
ऑफिसरने छान छुन केली अन्
कॉल सोडलेत
सकाळी पोस्टमन दारात आला
कॉल देवून चालता झाला
गावात साऱ्या बोभाटा झाला
धोंडूच्या पोराला कॉल हो आला

धोंडू बिचारा सावकाराकडे गेला
याजान पैका द्या शेट मला
सावकाराने चक्क नकार दिला
जमीन लिहून देतो म्हटल्या वर तयार झाला.

इकडे आईची धावपळ झाली
पहाटेच उठून कामाला लागली
चटणी भाकर तयार केली
जेवायला देवून सोबत बांधून ही दिली
अशातच पोराची मुलाखत झाली

पाहता पाहता चार दोन महिने गेली
म्हणून पोराने जावून विचारले
भ्रष्ट साहेबाने उत्तर हाय कॉलीटीचे
स्पर्धक होते आले

पोराने समजायचे ते समजून घेवून
सायंकाळी गावात आला अन्
चवताळ वाघासारखा बोलता झाला
कोणी हो पैशावाल्याने माझ्या अधिकाराच्या जागेवर
बलात्कार हो केला बलात्कार केला.
मला हो न्याय नाही
मला हो न्याय नाही मिळाला...

# रावसाहेब दानवेंच्या मुलीच्या कारचा अपघात

## रांजणगाव फाट्याजवळ घडली घटना



**कन्नड :** माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या कन्या आणि माजी जिल्हा परिषद सदस्या संजना जाधव यांच्या गाडीला समोरुन येणाऱ्या एका पिकअपने जोराची धडक दिली. सोमवारी सकाळी साडे अकरा वाजता चाळीसगाव तालुक्यातील रांजणगाव फाट्यावर हा अपघात झाला. सुदैवाने या अपघातात संजना जाधव थोडक्यात बचावल्या आहेत.

मिळालेली माहिती अशी की, संजना जाधव आपल्या चार कार्यकर्त्यांसोबत कन्नड तालुक्यातील सर्कलमधील वरठाण या ठिकाणी आपल्या एमएच २० एफपी ०६३६ या चारचाकीने जात होत्या. चाळीसगाव तालुक्यातील रांजणगाव फाट्याजवळ आल्यानंतर समोरुन आलेल्या एमएच ४२ बीएच ०६१३ या पिकअपने संजना यांच्या गाडीला समोरुन चालकाच्या बाजुने जोराची धडक दिली. सुदैवाने या अपघातात संजना जाधव, बाजार समितीचे उपसभापती जयेश बोरसे, माजी सरपंच ज्ञानेश्वर निकम, आदित्य गर्जे यांना कोणतीही इजा झाली नाही. अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिक घटनास्थळी दाखल झाले. यावेळी नागरिकांनी पळून जाणाऱ्या पिकअपला अडवत चालकाला पकडले.

पिकअपचा चालक दारु पिऊन गाडी चालवत होता

माजी जिल्हा परिषद सदस्या संजना जाधव यांच्या गाडीला धडक दिलेल्या पिकअपचा चालक हा गांजा ओढून आणि दारू पिऊन गाडी चालवत होता, अशी माहिती पोलिसांना दिली आहे.

नागरिकांनी पिकअप चालकाला दिला चोप अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिक अपघातस्थळी आले. नागरिकांनी पिकअप आडवत चालकाला बाहेर ओढले आणि चांगला चोप दिला.

# जागावाटपाचा निर्णय दोन-चार दिवसांतच शक्य - खासदार सुप्रिया सुळे

**मुंबई :** महाविकास आघाडीतील जागावाटपाबाबत शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मोठा दावा केला आहे. येत्या तीन-चार दिवसांत परिस्थिती स्पष्ट होणार असल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याबाबत बैठकांची फेरी सुरू झाली असून घटक पक्षांचीही आजही बैठक सुरु असल्याचे त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

या संदर्भात वृत्तसंस्थेशी बोलताना बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, "जयंत पाटील यांनी कालच स्पष्ट केले आहे की, जागावाटपाबाबत चर्चा सुरू आहे. आम्ही यासंदर्भात नियमित बैठकाही घेत आहोत, आजही बैठक होत आहे. येत्या ३-४ दिवसांत याबाबत परिस्थिती अधिक स्पष्ट होईल.'

पक्ष सोडणाऱ्या नेत्यांवर निशाणा पवारांचा निशाणा

दुसरीकडे, शरद पवार यांनी रविवारी सांगितले होते की, महाविकास आघाडी येत्या ८-१० दिवसांत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसंदर्भात जागावाटपाची चर्चा पूर्ण करेल. पक्ष सोडणाऱ्या नेत्यांवर निशाणा साधत शरद पवार म्हणाले होते की, त्यांच्यापैकी काहींना निवडणूक जिंकता येणार नाही.

कार्यकर्त्यांकडून मत मागवले जात आहे - शरद पवार

शरद पवार यांनी त्यांच्या पक्षात कोणाला तिकीट दिले जाणार हे देखील सांगितले होते. त्या जोरावर ज्या नेत्यांच्या विजयाची शक्यता आहे, त्यांना तिकीट मिळेल, असे शरद पवार म्हणाले होते. शरद पवार म्हणाले की, तुम्ही सर्व जागांवर निवडणूक लढवू शकत नाही आणि तुम्हाला इतर साथीदारांना उमेदवार उभे करू द्यावे लागतील आणि त्यांच्यासाठीही काम करावे लागेल. आम्हाला आमचे सरकार कोणत्याही परिस्थितीत बनवायचे आहे. ते म्हणाले की, महाविकास आघाडीचे घटक पक्ष खऱ्या दावेदारांवर कार्यकर्त्यांची मते घेत आहेत. प्रत्येक तालुकास्तरावर सर्वेक्षण करण्यात आले आहे. राजकीय पक्षांचे नेते स्वतःचे निर्णय घेऊ शकतात, पण कार्यकर्ते हे थेट जनतेशी जोडलेले असतात, असेही पवार म्हणाले.

# 'युवासेने'च्या विजयाला हायकोर्टात आव्हान

**मुंबई :** विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वातील युवासेनेने एकहाती विजय मिळवला. पण आता त्यांच्या विजयाला महाराष्ट्र स्टुडंट असोसिएशनने आव्हान दिले आहे. युवासेनेने सिनेट निवडणुकीच्या मतदार नोंदणीपासून अंतिम मतदार यादीपर्यंत संपूर्ण प्रक्रियाच घटनाबाह्य पद्धतीने राबवल्याचा आरोप या संघटनेने केला आहे. त्यामुळे युवासेनेच्या विजयावर सवाल उपस्थित केला जात आहे.

मुंबई विद्यापीठाच्या सिनेटची २ वर्षांनंतर नुकतीच निवडणूक झाली. त्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या युवासेनेने १० पैकी १० जागा जिंकत विरोधकांचा धुव्वा उडवला. पक्षाने या विजयाचे श्रेय आदित्य ठाकरे यांना दिले. त्याचा त्यांनी गुलाल उधळून आनंदही साजरा केला. पण आता सिनेटच्या निवडणूक प्रक्रियाला पर्यायाने युवासेनेच्या या विजयाला थेट मुंबई उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. युवासेनेने सिनेट निवडणुकीच्या मतदार नोंदणीपासून अंतिम मतदार यादीपर्यंत संपूर्ण प्रक्रिया ही घटनाबाह्य पद्धतीने राबवली. त्याचा त्यांना निवडणुकीत लाभ झाला, असा आरोप महाराष्ट्र स्टुडंट असोसिएशनने आपल्या याचिकेत केला आहे. या आरोपामुळे युवासेनेच्या विजयाच्या आनंदावर विरजन पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

युवासेनेचा विजय कायदेशीर नाही

महाराष्ट्र स्टुडंट युनियनने यासंबंधीच्या आपल्या निवेदनात म्हटले आहे की, मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया (मतदार नोंदणीपासून अंतिम मतदार यादीपर्यंत) असंवैधानिक आणि मर्यादित पद्धतीने राबविल्यामुळे या प्रक्रियेतून निवडून आलेल्या युवासेनेच्या दहा प्रतिनिधींना कायदेशीर सिनेट पदवीधर प्रतिनिधी म्हणून मान्यता करता येणार नाही.

महाराष्ट्र स्टुडंट्स युनियनची मागणी विद्यापीठ अधिनियमानुसार लोकशाही प्रक्रियेद्वारे पर्याप्त आणि सर्वसमावेशक प्रतिनिधित्व व पारदर्शक निवडणुकीची होती व राहील. नोंदणी शुल्क, प्रक्रियेतील त्रुटी, आणि सत्ताधारी पक्षाच्या अतिरिक्त राजकीय हस्तक्षेपामुळे "विद्यार्थी" हा महत्त्वाचा घटक या प्रक्रियेतून वगळला गेला आहे.

महाराष्ट्र स्टुडंट्स युनियनने या निवडणूक प्रक्रियेला आव्हान दिलेले असून, याचिका सध्या मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. न्यायालयाने राज्य सरकार आणि विद्यापीठ प्रशासनाला आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी नोटीस बजावलेली आहे आणि पुढील सुनावणी १८ ऑक्टोबर रोजी ठेवली आहे. त्यामुळे अद्याप या मुद्यावर अंतिम निर्णय झालेला नाही, असे संघटनेने म्हटले आहे.


